**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यापार आणि उद्योग क्षेत्रातल्या प्रतिनिधींसोबत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची अर्थसंकल्पपूर्व बैठक
- आरटीजीएस अथवा एनईएफटीने पैसे हस्तांतरित करण्यापूर्वी खातेदाराचे नाव दाखवण्याचे रिझर्व्ह बँकेचे बँकांना आदेश
- राष्ट्रीय छात्रसेनेच्या प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराला नवी दिल्लीत सुरुवात, यंदा विक्रमी ९१७ विद्यार्थिनींचा समावेश
- अंतराळात झेपावलेले उपग्रह कक्षेतच एकमेकांना जोडण्याच्या प्रयोगासाठी इसरो सज्ज

  **आणि**

- बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात भारताचा १८४ धावांनी पराभव

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज दिल्लीत अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली. या बैठकीत व्यापार आणि उद्योग प्रतिनीधी तसंच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातले तज्ञ सहभागी झाले होते. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज या बैठकीला वित्त, गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग आणि केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार यासह अनेक विभागांचे सचिव उपस्थित होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १

फेब्रुवारी रोजी संसदेत सादर होण्याची अपेक्षा आहे. अर्थमंत्री सीतारामन यांचा हा सलग आठवा अर्थसंकल्प असेल.

**<><><><><>**

आरटीजीएस अथवा एनईएफटी प्रणालीचा वापर करून ऑनलाईन पद्धतीनं बँक खात्यात पैसे जमा करणाऱ्या व्यक्तींना, असा आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी संबंधित लाभार्थ्याच्या बँक खात्यासोबत नोंदवलेल्या नावाची पडताळणी करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश भारतीय रिझर्व्ह बँकनं दिले आहेत. या संदर्भातलं परिपत्रकही बँकेनं आज जारी केलं. आरटीजीएस आणि एनईएफटीचे थेट किंवा उपसदस्य असलेल्या सर्व बँकांनी येत्या १ एप्रिल २०२५ पर्यंत ही सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी सूचनाही रिझर्व्ह बँकेनं केली आहे.

ही सुविधा सुरू झाल्यानंत पैसे जमा करणाऱ्या व्यक्तींनी लाभार्थ्यांचा खाते क्रमांक आणि बॅक शाखेचा आयएफएससी कोड भरल्यानंतर, लाभार्थ्याचे बँक खात्यात नोंद असलेले नाव आपोआप दिसू लागेल.

या सुविधेमुळे ग्राहकांमध्ये त्यांचे पैसे योग्य व्यक्तीला जात असल्याबद्दलचा विश्वास वाढेल आणि फसवणुकीची शक्यताही कमी होईल असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या विविध सामाजिक - राजकीय घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रशासनानं १२ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी केले

आहेत. मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षणासाठी सुरू असलेली आंदोलनं, मस्साजोग इथल्या सरपंचांच्या हत्या प्रकरणावरून सुरू असलेलं आंदोलन, आणि येऊ घातलेलं नववर्ष या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात तणावाची स्थिती निर्माण होऊ नये, तसंच कायदा व्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मनाई आदेश जारी केल्याचं जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याप्रकरणी आमदार सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आज परभणी जिल्ह्याला भेट देऊन, न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी आणि आंबेडकरी चळवळीचे नेते विजय वाकोडे यांच्या कुटुबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

यावेळी आठवले यांनी त्यांच्या पक्षाच्या वतीनं सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. तर वाकोडे यांच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांची मदत आणि घरातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

संविधान हा देशाचा आत्मा असून परभणीत संविधानाचा अवमान केला गेला,अशी प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राष्ट्रीय छात्रसेनेच्या प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराला आज नवी दिल्लीच्या करिअप्पा मैदानावर सर्वधर्म पूजनाने प्रारंभ झाला. २८ राज्य आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधून आलेले २हजार ३६१ छात्रसैनिक महिनाभर चालणाऱ्या या शिबिरात सहभागी होत आहेत. त्यात विक्रमी ९१७ विद्यार्थिनींचा समावेश आहे. जम्मूकाश्मीर आणि लडाखमधून ११४  छात्रसैनिक शिबिरात आले आहेत. तर ईशान्येकडच्या राज्यांचं प्रतिनिधित्व  १७८ छात्रसैनिक करत आहेत. याखेरीज १४ मित्रदेशांमधले कॅडेट्स युवा आदानप्रदान कार्यक्रमाअंतर्गत सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था - इस्रो आज रात्री श्रीहरिकोटा इथून दोन उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. इस्त्रोचा अग्निबाण, 476 किलोमीटरच्या वर्तुळाकार कक्षेत एस डी एक्स 01 आणि एस डी एक्स 02 या दोन उपग्रहांना स्थापित करेल. त्यानंतर अंतराळातच हे उपग्रह जोडण्याचा प्रयोग करण्यात येणार आहे.  ही कामगिरी करणारा भारत हा जगातला चौथा देश ठरेल. केवळ अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनीच आत्तापर्यंत स्पेस डॉकिंग तंत्रज्ञानात प्राविण्य मिळवले आहे.

**<><><><><>**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी प्रवाशांच्या सोयाीसाठी मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे उद्या रात्री विशेष उपनगरीय रेल्वे गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वेवर विशेष गाडी सीएसएमटी स्थानकातून आणि कल्याणहून रात्री दीड वाजता सुटेल. हार्बर मार्गावर विशेष गाडी सीएसएमटी आणि पनवेल इथून रात्री दीड वाजता सुटेल.

पश्चिम रेल्वेवर देखील चर्चगेट आणि विरार दरम्यान ८ विशेष गाड्या चालवल्या जातील. चर्चगेटहून ही गाडी रात्री सव्वा वाजता, २ वाजता, अडीच वाजता आणि ३ वाजून २५ मिनीटांनी सुटेल. तर विरारहून रात्री सव्वा बारा वाजता, पाऊण वाजता, १ वाजून ४० मिनीटांनी आणि पहाटे ३ वाजून ५ वाजता सुटेल.

मुंबईतल्या समुद्र किनाऱ्यांवर प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्टच्या वतीनं उद्या विविध मार्गांवर रात्री २५ जादा बसगाड्या सोडण्यात येणार आहे. प्रवाशांसाठी ३१ डिसेंबर रोजी दक्षिण मुंबईतल्या विविध ऐतिहासिक आणि प्रेक्षणिय स्थळांच्या हेरिटेज टूरसाठी वातानुकुलित दुमजली बस चालवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, २०२४ हे वर्ष संपायला आता अवघा १ दिवस शिल्लक आहे. या वर्षभरात घडलेल्या विविध क्षेत्रातल्या घडामोडींचा आढावा आपण ‘सरत्या वर्षाच्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार आहोत. रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हे ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

पिकांना कायदेशीर हमीभाव मिळावा यासाठी पंजाबमध्ये शेतकरी संघटनांनी आज पुकारलेला एक दिवसाचा बंद शांततेत पार पडला. या बंदमुळे राज्यातली रेल्वे आणि रस्ते वाहतूक विस्कळीत झाली, मात्र रुग्णवाहिका तसंच इतर अत्यावश्यक आणि आपत्कालीन सेवांना या बंदमधून सुट दिली गेली होती.

**<><><><><>**

इथिओपियामध्ये प्रवाशांनी भरलेला ट्रक नदीत कोसळल्यानं किमान ७१ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ६८ पुरुष आणि तीन महिलांचा समावेश आहे. इथिओपियाची राजधानी अदिस अबाबापासून सुमारे ३०० किलोमीटरवर असलेल्या सिदामा मध्ये काल हा अपघात झाला.

**<><><><><>**

पाकिस्तानमध्ये आज झालेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये १६ जण ठार, तर २२ जण जखमी झाले आहेत. यापैकी एक अपघात पंजाब प्रांतातल्या अटक जिल्ह्यात तर दुसरा अपघात सिंध प्रांतातल्या नौशारो फिरोज जिल्ह्यात झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पहिला अपघात भरधाव वेगानं जाणारी प्रवासी बस उलटल्यामुळं तर दुसरा अपघात एका प्रवासी वाहनांची आणि ट्रेलरची धडक झाल्यामुळं झाला असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

बॉर्डर-गावस्कर चषक क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात आज ऑस्ट्रेलियानं भारताचा १८४ धावांनी पराभव केला. ५ सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलिया २ - १ नं आघाडीवर आहे.

दुसऱ्या डावात विजयासाठी ३४० धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघानं आपल्या पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या.

प्रत्युत्तरादाखल भारतानं पहिल्या डावात ३६९ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २३४ धावांमध्ये आटोपल्यानंतर सामना जिंकण्यासाठी भारतापुढे ३४० धावांचं आव्हान होतं. त्याचा पाठलाग करतांना भारताचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. भारतातर्फे यशस्वी जैस्वालनं सर्वाधिक ८४ धावा केल्या. नितीश रेड्डीचं शतक आणि जसप्रित बुमराह नं घेतलेले ५ बळी महत्त्वाचे ठरले तरी भारताला सामाना जिंकता आला नाही.

दरम्यान, या विजयासोबतच ऑस्ट्रेलियाच्या संघाने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान निश्चित केलं आहे. दक्षिण आफ्रिका संघानं पाकिस्तानचा पराभव करत यापूर्वीच अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांचं काल रात्री जॉर्जियातल्या प्लेन्स इथल्या निवासस्थानी निधन झालं. ते १०० वर्षांचे होते. कार्टर हे १९७७ ते १९८१ या कालावधीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांना २००२ मध्ये शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. ते आतापर्यंतचे सर्वात वयोवृद्ध राष्ट्रपती होते. भारताला भेट देणारे कार्टर हे अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्या सन्मानार्थ हरियाणातल्या एका गावाचं नाव कार्टरपुरी ठेवण्यात आलं. जिमी कार्टर यांनी भारत दौऱ्यावर असताना तत्कालीन प्रधानमंत्री मोरारजी देसाई यांच्यासोबत दिल्ली जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली होती. या घोषणेनं भारत-अमेरिका संबंधांचं नवं पर्व सुरू झालं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जिमी कार्टर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे. कार्टर हे दूरदृष्टीचे महान राजकारणी होते. जागतिक शांततेसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. भारत- अमेरिकेतले संबंध आणखी मजबूत करण्यात त्यांचं मोठं योगदान आहे, असं मोदी आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत.